# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ८२–२०१०/ दिनांक :

श्री. आण्णासो रामचंद्र यादव ,
रा. वायफळे, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. बी.जी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. आण्णासो रामचंद्र यादव , रा. वायफळे, ता. जत, जि. सांगली यांनी वि.प.कडे शेतीपंपासाठी नवीन वीज पुरवठा मिळणेसाठी दि. ८.१.२०१० रोजी अर्ज दाखल केला होता. त्यांना दि. ७.२.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते, परंतु चलन मिळाले नाही. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. ४.३.२०१० रोजी चलन मिळणेसाठी तक्रार दाखल केली.

सांगली कक्षाने चलन देणेबाबत दि. १८.३.२०१० रोजी तक्रारदाराला कृती मानकातील विनियम २००५ प्रमाणे कार्यवाही करण्यासंबंधी आदेश दिले होते. परंतु तक्रारदाराचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी ‘ अ ‘ फॉर्ममध्ये मंचाकडे दि. १.४.२०१० रोजी तक्रार दाखल केली व कृती मानकांतील तरतुदीनुसार चलन व वीज कनेक्शन मिळावे तसेव विलंबापोटी नुकसान भरपाई मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने दिनांक १२.५.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांचा मागणी अर्ज दिनांक ८.१.२०१० ला प्राप्त झाल्याचे मान्य केले व त्यांस दि.१८.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे असे नमूद केले आहे.

प्रस्तुत तक्रार मंचाकडे सुनावणीसाठी दि. १८.५.२०१० रोजी ठेवली असता तक्रारदार प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, कनिष्ठ अभियंता, संख उप विभाग, श्री. ए.के. कु लकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग हजर होते. दि. १८.२.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे व त्यांनी विलंब मान्य केला आहे. तथापि तक्रारदाराने तक्रार मागे घेत असल्याचे व नुकसान भरपाई नको असल्याचे दि. १८.२.२०१० चे पत्र वि.प. यांनी मंचापुढे हजर केले. मूळ ‘ अ ‘ फॉर्मवरील अर्जावर तक्रारदाराने मराठीत सही केलेली असून तक्रार मागे घेण्याच्या अर्जावर मात्र इंग्रजीमध्ये सही असल्याचे आढळून आले.

वि.प. तर्फे श्री. मैंलापुरे, कनिष्ठ अभियंता यांनी तक्रारदाराने तक्रार मागे घेतल्याची सही त्यांचीच आहे याची खात्री दिल्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल असे मंचास वाटते. त्यामुळे खालील निर्णय देत आहोत.

## <u>आदेश</u>

१) तक्रारदाराची तक्रार मागे घेतल्याने निकाली काढण्यात येत आहे.

२) भरपाईबाबत आदेश नाही

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

(जी. बी. पानकर,)
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :